मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिका शाळांमध्ये सुरक्षा उपायांबाबत विविध उपक्रम

## प्राथमिक, माध्यमिक शाळांमध्ये सर्वसमावेशक सुरक्षा उपायांबाबत विविध उपक्रम: पालक, पोलीस प्रशासन, सामाजिक संस्थांचाही सहभाग वाढविण्यावर भर

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी महापालिकेच्या सर्व प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये सर्वसमावेशक सुरक्षा उपायांबाबत विविध उपक्रम राबविले जात आहेत. याअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करून विविध उपाययोजना केल्या जात असून यामध्ये पालक, पोलीस प्रशासन तसेच विविध सामाजिक संस्थांचाही सहभाग वाढविण्यावर भर दिला जात आहे.

'पोलीस काका' उपक्रम आणि 'दामिनी' पथकासह स्थानिक पोलीस दलांच्या सहकार्याने महापालिकेच्या वतीने विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांसाठी सुरक्षा जागरूकता सत्रांचे आयोजन केले जात आहे. या सत्रांद्वारे रस्ते किंवा इतर अपघातांपासून आणि शाळा तसेच आजूबाजूच्या इतर परिसरातील सुरक्षा उपायांवर मार्गदर्शन केले जात आहे.बाल लैंगिक शोषण, गुड टच आणि बॅड टच, पालकांची भूमिका आणि मुलांचे हक्क याबद्दल जागरूकता सत्र आयोजित करण्यासाठी मुस्कान फाउंडेशन तसेच महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेसोबत काम करणाऱ्या अर्पण संस्थेसारख्या संस्थांसोबत महापालिकेने भागीदारी केली आहे. मुलांचे अत्याचारापासून संरक्षण कसे करावे आणि त्यांची सुरक्षितता कशी सुनिश्चित करावी याबद्दल शाळांमध्ये या संस्थांमार्फत शिबीरांचे आयोजन केले जात आहे.



### महापालिकेच्या वतीने शाळांमध्ये राबविण्यात आलेले सुरक्षितता उपाय

» स्थानिक पोलिस, पोलिस काका आणि दामिनी पथकासह शाळांमध्ये सुरक्षा जागरूकता सत्रांचे आयोजन. गु सुरक्षिततेबाबत जागरूकता वाढविण्यासाठी नियमित पालक सभेचे आयोजन. ड टच, बॅड टच याबाबत मुलांना शिक्षित करण्यासाठी मुस्कान फाउंडेशनसोबत भागिदारी व शिबिरांचे आयोजन. राष्ट्रीय बालहक्क सुरक्षा आयोग तसेच राष्ट्रीय शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार महापालिका शाळांचे सर्वसमावेशक लेखापरिक्षण.

> महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांची सुरक्षा ही सर्वोच्च प्राथमिकता असून सर्व शाळांमध्ये सुरक्षित आणि पोषक वातावरण निर्माण करण्यावर महापालिकेने नेहमी भर दिला आहे. यासाठी समुपदेशकांची नियुक्ती आणि शाळेच्या सर्वांगीण सुरक्षिततेबाबत विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याला वर्षभर सुरक्षित वातावरणात शिक्षण घेता यावे, त्याच्या कलागुणांना वाव मिळावा आणि शिक्षणातील गोडी वाढावी यासाठी महापालिका कटिबद्ध आहे.
>
> - शेखर सिंह,आयुक्त,पिंपरी-चिंचवड महापालिका.

> पालकांचा सहभाग देखील सुरक्षा उपायांच्या मालिकेचा एक महत्त्वाचा भाग आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी, घरात तसेच समाजात सुरक्षित वातावरण राखण्यासाठी पालकांच्या सहभागाला प्रोत्साहन देऊन महापालिका शाळांमध्ये नियमित पालक सभांचे आयोजन केले जात आहे.
>
> - प्रदीप जांभळे पाटील,अतिरिक्त आयुक्त,पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

# महापालिकेच्या कर्मचारी संघटनांचे आझाद मैदानावर धरणे आंदोलन

## महापालिका कायम व कंत्राटी कामगार कर्मचा-यांच्या विविध मागण्यांसाठी मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करण्यात येणार आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यातील महापालिकेच्या कायम व कंत्राटी कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी बुधवार (दि. २८) पासून आझाद मैदान, मुंबई येथे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

महापालिका कायम व कंत्राटी कामगार कर्मचा-यांच्या विविध मागण्यांसाठी बुधवारी (दि. २८) मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करण्यात येणार आहे. पदाधिका-यांना चर्चेसाठी बोलावून कामगार कर्मचा-यांचे प्रश्न निकाली काढावे.

अन्यथा मागण्यांच्या पूर्ततेसाठी संपूर्ण राज्यातील महानगरपालिका अंतर्गत अत्यावश्यक सेवेसह इतर कामकाज बंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र राज्य महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना फेडरेशनचे अध्यक्ष शशिकांत ऊर्फ बबनराव झिंजुर्डे यांनी दिली.

या निवेदनावर अशोक जाधव, कॉ. गणेश शिंगे, गौतम खरात, मनोज माछरे, शब्बीर अहेमद, उदय भट, रामगोपाल मिश्रा, वामण कविस्कर, त्रिशला कांबळे, प्रल्हाद कोतवाल, चेतन आंबोणकर, रवि राव, प्रकाश जाधव, सतिश चिंडालिया, अंकुश गायकवाड, विठ्ठल देवकत्ते, अशोक जानराव, सुरेंद्र टिंगणे आदींनी स्वाक्ष-या केल्या आहेत.



### प्रमुख मागण्या

- » ड वर्ग महापालिका कर्मचा-यांच्या मासिक वेतनावर १०० टक्के अनुदान द्यावे.
- » महापालिका कर्मचा-यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे.
- » १०/२०/३० वर्षे मनपा सेवा झालेल्या कर्मचा-यांना प्रगती योजना लागू करणे.
- » मनपा अंतर्गत रोजंदारीवर काम करणा-या कर्मचा-यांना सेवेत कायम करणे.
- » कायम कर्मचा-यांना दिपावलीनिमित्त बक्षिस मिळणे व कंत्राटी कर्मचा-यांना ८.३३ टक्के सानुग्रह अनुदान द्यावे.
- » कंत्राटी स्वच्छता व इतर विभागातील कामगारांना कायम करावे किंवा कायम कामगारांएवढे समान काम समान वेतन द्यावे.
- » महापालिका, नगरपालिका मधील लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने नेमणुका बाबत न्यायालयात प्रलंबित याचिके संदर्भात उपसमिती नेमून वाल्मिकी, मेहतर, भंगी, अनुसूचित जाती संवर्गा व्यतीरिक्त इतर संवर्गातील वारसांना नेमणूक देणेसाठी पुढील कार्यवाही करावी.
- » पुणे, पिंपरी-चिंचवड व इतर मनपा अंतर्गत परिवहन संस्थेमधील कर्मचा-यांना व इतर कर्मचा-यांना सातवा वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम तात्काळ अदा करावेत.

# भाजपचा बडा नेता तुतारी हाती घेणार? शरद पवारांसोबत एकाच गाडीत केला प्रवास

## महायुतीतील अनेक नेते शरद पवारांच्या पक्षात येणार असल्याच्या चर्चा, नगर जिल्ह्यात शरद पवार मोठा राजकीय भूकंप करण्याच्या तयारीत असल्याचं बोललं जात आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

भाजपचा बडा नेता तुतारी हाती घेणार असल्याच्या चर्चांना उधाण आले या दरम्यान भाजप नेते विवेक कोल्हे यांनी आज शरद पवारांची भेट घेतल्याची माहिती समोर आली आहे.

आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने राज्यात मोठ्या घडामोडी घडत असल्याचं चित्र आहे. अशातच महायुतीतील अनेक नेते शरद पवारांच्या पक्षात येणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. नगर जिल्ह्यात शरद पवार मोठा राजकीय भूकंप करण्याच्या तयारीत असल्याचं बोललं जात आहे. भाजपचा बडा नेता तुतारी हाती घेणार असल्याच्या चर्चांना उधाण आले या दरम्यान भाजप नेते विवेक कोल्हे यांनी आज शरद पवारांची भेट घेतल्याची माहिती समोर आली आहे. विवेक कोल्हे आणि शरद पवार यांनी आज एकाच गाडीतून प्रवास केल्याची माहिती समोर आली आहे.



### विवेक कोल्हे विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक

» विवेक कोल्हे हे सहकारातील दिग्गज नेते शंकरराव कोल्हे यांचे नातू आहे. तर माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांचे चिरंजीव आहेत. काही दिवसांपूर्वी विवेक कोल्हे यांनी नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघात नशिब अजमावण्याचा प्रयत्न केला होता. या निवडणुकीत त्यांनी किशोर दराडे त्यांना तगडे आव्हान दिले होते. आता विवेक कोल्हे हे विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक आहेत.

राज्यात महायुती सरकारमध्ये आगामी विधानसभा निवडणुकीसाठी काही जागांवर तेढ निर्माण झाली आहे, त्याचप्रमाणे कोपरगावमध्ये ही मतदारसंघावरून आणि जागेवरून धुसफूस पाहायला मिळत आहे. विद्यमान आमदार आशुतोष काळे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात आहे. उपमुख्यमंत्री अजित पवारांनी काही दिवसांपूर्वीच आशुतोष काळे यांनी उमेदवारी निश्चित केली आहे. त्यामुळे भाजप नेते विवेक कोल्हे कोडींत सापडले आहेत. आता विवेक कोल्हे राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश करणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. याच दरम्यान आज शरद पवार आणि विवेक कोल्हे यांनी आज एकाच गाडीतून प्रवास केला. या प्रवासावेळी त्यांच्यामध्ये काय चर्चा झाली असावी याबाबत उत्सुकता नेत्यांना लागली आहे.

### शरद पवारांसोबत एकत्र प्रवास

» यामुळे आता पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात शरद पवार भाजपला आणखी एक धक्का देण्याच्या तयारीत असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. कोपरगावचे विवेक कोल्हे आणि शरद पवार (यांनी एकत्र प्रवास केला. शरद पवार यांनी विवेक कोल्हे यांना स्वतःच्या गाडीत बसण्याची सूचना केली. त्यानंतर विवेक कोल्हे हे पवारांच्या गाडीतून रवाना झाले. कोल्हे सध्या भाजपमध्ये आहेत मात्र, भाजपमध्ये ते नाराज असल्याची चर्चा सुरू आहेत. ते विधानसभा निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाकडून लढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# पालिकेच्या पूर समितीचा अहवाल कधी? कारणे शोधण्यासाठी दिलेली आठ दिवसांची मुदत संपून महिना झाला

## सिंहगड रस्ता परिसरासह शहरात पूर परिस्थिती निर्माण होती,या स्थितीची कारणे शोधण्यासाठी महापालिकेने तीन सदस्यांची समिती नेमली होती

**पुणे | प्रतिनिधी**

खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग झाल्यानंतर सिंहगड रस्ता परिसरासह शहरात पूर परिस्थिती निर्माण होते. या स्थितीची कारणे शोधण्यासाठी महापालिकेने तीन सदस्यांची समिती नेमली होती. ही समिती अभ्यास करून आठ दिवसात अहवाल सादर करणार होती. मात्र, महिना झाला तरी समितीला अहवाल सादर करता आलेला नाही.

धरणातून पाण्याचा विसर्ग झाल्यावर नदीचे पाणी नागरिकांच्या घरात शिरले, नागरिकांचे संसार पाण्यात वाहून गेले. या परिस्थितीला नदीपात्रातील राडारोडा तसेच नदीसुधार प्रकल्पाचे काम जबाबदार असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच नवनवीन कारणेही पुढे आणली जात होती. यामुळे पालिकेने समिती नेमली. समितीमध्ये पथ बांधकाम विभागाचे पथ विभागाचे अधीक्षक अभियंता साहेबराव दांडगे, कार्यकारी अभियंता बिपीन शिंदे, ड्रेनेज विभागाचे दिनकर गोंजारी आणि आमंत्रित सदस्य म्हणून जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता सुनंदा जगताप यांचा समावेश केला होता.



### कायमस्वरूपी उपाययोजना केल्या जाणार

» समिती शहरातील पूरपरिस्थितीचा अभ्यास करून पुराचे खरे कारण शोधणार होती. समितीचा अहवाल सात दिवसांत आल्यावर पूरग्रस्त भागात कायमस्वरूपी उपाययोजना केल्या जाणार होत्या. अजून अहवाल नाही आणि उपाययोजनाही नाहीत अशी परिस्थिती सध्या आहे. आता घाट माथ्यावर पुन्हा दमदार पाऊस झाल्याने पुन्हा धरणातून पाणी सोडल्याने पुराची भीती आहे. यावेळी महापालिकेची पूर्ण यंत्रणा सज्ज होती. त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागला नाही. असे असले तरी पुराचे खरे कारण समोर आल्याशिवाय उपाययोजना शक्य नाही.

> सिंहगड रस्ता आणि शहरात पूर परिस्थिती निर्माण झाली. या पूरस्थितीला नदीतील राडारोडा तसेच इतर कारणे सांगितली जात आहेत. मात्र, या भागात कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी पुराचे मूळ कारण शोधले जाणार आहे. त्यासाठी पथ, ड्रेनेज आणि बांधकाम विभागातील प्रत्येकी एक अधिकारी अशी तीन सदस्यांची समिती नेमली आहे. जलसंपदा विभागाचा एक आमंत्रित सदस्य आहे. या समितीने अहवालाचा मसुदा तयार केला आहे. त्यावर चर्चा करून अंतिम अहवाल तयार होईल.
>
> - पृथ्वीराज बी पी. अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका.

समिती शहरातील पूरपरिस्थितीचा अभ्यास करून पुराचे खरे कारण शोधणार होती. समितीचा अहवाल सात दिवसांत आल्यावर पूरग्रस्त भागात कायमस्वरूपी उपाययोजना केल्या जाणार होत्या. अजून अहवाल नाही आणि उपाययोजनाही नाहीत अशी परिस्थिती सध्या आहे. आता घाट माथ्यावर पुन्हा दमदार पाऊस झाल्याने पुन्हा धरणातून पाणी सोडल्याने पुराची भीती आहे. यावेळी महापालिकेची पूर्ण यंत्रणा सज्ज होती. त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागला नाही. असे असले तरी पुराचे खरे कारण समोर आल्याशिवाय उपाययोजना शक्य नाही. पूर परिस्थिती निर्माण झाली. त्यानंतर हा भराव काढून टाकण्याची मोहीम महापालिकेने आखली होती. काही दिवसांनंतर ही कारवाई थंडावली. त्यामुळे पालिकेने ही मोहीम नेमकी कोणाच्या सांगण्यावरून थांबवली, याचे राजकारण झाले का, असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

# भाडेपट्टी भरा अथवा त्वरित कारवाई

## भाडेपट्टी न भरणाऱ्या सतराशे मिळकतधारकांवर टांगती तलवार : पीएमआरडीएकडून कारवाई प्रस्तावित, नोटीसही बजावल्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

पीएमआरडीएमध्ये विलीन झालेल्या तत्कालीन पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणामार्फत शहरात हुडकोच्या अर्थसाह्याने गृहप्रकल्प राबवण्यात आले होते. जवळपास ६ पेठांचे सर्वेक्षण केल्यानंतर त्यापैकी अद्याप काही जणांनी भाडेपट्टी, त्या संबंधित दस्त प्रक्रिया पूर्ण केली नसल्याचे समोर आले आहे. अशा या गृहप्रकल्पातील १६९३ लाभार्थ्यांनी सदनिकेबाबत तसेच २० लाभार्थ्यांनी दुकानांबाबत प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. त्यामुळे अशा लाभार्थ्यांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पीएमआरडीए प्रशासनाकडून देण्यात आला आहे.




संबंधित मिळकतधारकांनी २००५ पर्यंत हप्ते परतफेड करणे अपेक्षित होते. मात्र, हजारो लाभार्थ्यांनी हप्ते भरले नाहीत. तसेच सदनिकेचे व दुकानांची भाडेपट्टी, दस्त करून घेणे आवश्यक होते. मात्र काही लाभार्थ्यांनी विहित मुदतीत हप्ते भरलेले नाहीत तसेच भाडेपट्टी, दस्त केलेले नाहीत.

त्यामुळे पीएमआरडीएतर्फे २००८ आणि २०१९ मध्ये विशेष योजनेंतर्गत भाडेपट्टी व दस्त प्रक्रिया करून देण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. त्यालाही काही लाभार्थ्यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अशा लाभार्थ्यांच्या मालमत्तांचे पीएमआरडीएमार्फत सर्वेक्षण करण्यात आले असून मूळ लाभार्थ्यांना नोटीस देत भाडेपट्टी करण्याचे निर्देश दिले आहेत.

त्यामुळे संबंधितांनी विहित मुदतीत भाडेपट्टी करून घेणे अपेक्षित असून ते करून न घेणाऱ्या सदनिकाधारकांवर कारवाई प्रस्तावित करण्यात येणार आहे. यासह सदनिकाधारकांनी संबंधित सदनिका अन्य व्यक्तीस हस्तांतरित केली असल्यास हस्तांतरणाची प्रक्रिया करून घेणे गरजेचे आहे.

दरम्यान, सदनिका व दुकानांचे वाटप करताना लाभार्थ्यांना तत्कालीन पीसीएनटीएकडून 'अलॉटमेंट लेटर' (देकार पत्र) देण्यात आले. त्यानंतर भाडेपट्टी, दस्त प्रक्रिया करणे आवश्यक होते. त्यामुळे सदनिका लाभार्थ्यांच्या नावाने भाडेपट्ट्याने असल्याची नोंद होते. मात्र, थकीत हप्ते तसेच इतर शुल्क यामुळे लाभार्थ्यांकडून दुर्लक्ष करण्यात येते.

### या सहा पेठांमध्ये सर्वेक्षण

**» भाडेपट्टी न केलेल्या मिळकतींचे पीएमआरडीएतर्फे सर्वेक्षण करण्यात आले. यात पेठ क्रमांक दोनमध्ये १०७८, पेठ क्रमांक २१ मध्ये २४९ तसेच पेठ क्रमांक २५ मध्ये ११८, पेठ क्रमांक २७ 'अ' मध्ये ७८ तर पेठ क्रमांक २८ मध्ये १७० सदनिका तर पेठ क्रमांक दोनमधील २० दुकाने अशा एकूण १७१३ मिळकतींची भाडेपट्टा व दस्त प्रक्रिया झाली नसल्याचे समोर आले.**

> मिळकतीचा भाडेपट्टा न झाल्याने लाभार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांनी भाडेपट्टा, दस्त प्रक्रिया करून घ्यावी.
>
> **- डॉ. योगेश म्हसे, आयुक्त, पीएमआरडीए.**

# नागरी समस्या सोडविण्याचे आश्वासन

## नागरीकरण मोठ्या प्रमाणात वाढत आहे, त्या वेगाने पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यासाठी महानगरपालिका प्रशासन सक्षम आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराचा विकास झपाट्याने होत आहे. नागरीकरण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्या वेगाने पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यासाठी महानगरपालिका प्रशासन सक्षम आहे. मात्र, सर्व समस्या एकाच वेळी सुटणार नाहीत. त्यासाठी प्रशासनाला वेळ द्यावा लागेल. सोसायटीधारकांच्या समस्या सोडवण्याबाबत आम्ही कटिबद्ध आहोत, असा विश्वास महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिला.



चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनच्या पुढाकाराने 'संवाद सोसायटीधारकांचा' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी महानगरपालिका व पोलीस प्रशासनातील अधिकाऱ्यांनी सोसायटीधारकांशी विविध मुद्यांवर संवाद साधला. यावेळी आमदार महेश लांडगे, महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, पिंपरी-चिंचवडचे सहपोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, महापालिका मुख्य अभियंता मकरंद निकम, पोलीस उपायुक्त शिवाजी पवार, बापू बांगर, सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे तसेच परिसरातील सोसायटीचे पदाधिकारी उपस्थित होते.

सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड शहरात मोठ्या प्रमाणात सोसायट्या स्थापन होत आहेत. या सोसायट्या स्थापन झाल्यानंतर सोसायटीधारकांचे अनेक प्रश्न मांडण्यासाठी एक व्यासपीठ आवश्यक होते. त्यासाठी २०१६ साली पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनची स्थापना करण्यात आली. सोसायटी गृहनिर्माण अधिनियमाबाबत सोसायटी संचालित करण्यासंदर्भात मार्गदर्शन करणे, विकासकाकडून अपुरी राहिलेली कामे पूर्ण करून घेण्याची प्रक्रिया करणे, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांकडून सोसायटीधारकांच्या विविध अडचणी लोकप्रतिनिधीसमोर मांडून त्या सोडविण्यासाठी फेडरेशन सतत कार्यरत आहे.

यामध्ये रस्ते, पाण्याची समस्या, कचऱ्याची समस्या, कराची समस्या यांसारख्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी फेडरेशन काम करीत आहे. सोसायटी फेडरेशनच्या अंतर्गत १३६७ सोसायट्या नोंदणीकृत झाल्या आहेत, ज्यात जवळपास ४० हजार फ्लॅट्सचा समावेश आहे. पिंपरी-चिंचवडमधील सोसायट्यांचा बुलंद आवाज म्हणून या फेडरेशनकडे पाहिले जाते. 'सोसायट्यांचा संवाद' कार्यक्रमात सुमारे अडीच हजार सोसायटीधारक सहभागी झाले होते.

> महानगरपालिका लवकरच शहरातील खड्डे आणि खड्डे बुजवणार आहे. सोसायटीधारकांच्या तक्रारीनुसार अतिक्रमणांवर कारवाई केली जाईल आणि त्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले जातील. पाणीपुरवठा सक्षम करण्यासाठी आम्ही सकारात्मक आहोत. मात्र, शहरात दरडोई पाण्याचा वापर जास्त आहे. त्यामुळे पाण्याची बचत आणि अपव्यय टाळण्यावरही पिंपरी-चिंचवडकरांनी भर दिला पाहिजे. हा उपक्रम स्तुत्य आहे. तीन ते चार महिन्यांतून एकदा असा संवाद व्हावा. या करिता आम्ही भविष्यात प्रयत्नशील राहणार आहोत.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

# पालिका आयुक्तांची आरोग्याधिकाऱ्यांना तंबी

## आदेशानंतरही पदभार न सोडणाऱ्यांवर कारवाईचा इशारा : आरोग्य प्रमुखांना अंधारातून ठेवून करण्यात येणारे गैरव्यवहार रोखणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या आरोग्य विभागात वर्षानुवर्षे एकाच विभागात असलेल्या साहाय्यक आरोग्य अधिकाऱ्यांकडून कार्यभार काढून घेत आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी त्यांच्या मनमानीला सुरुंग लावला आहे. मात्र, आदेश देऊनही काही आरोग्य अधिकारी त्यांचा पदभार सोडत नसल्यास थेट एकतर्फी कार्यभार काढून घेतला जाईल, अशी तंबी आयुक्तांनी निर्णयाला विरोध करणाऱ्यांना दिली आहे.

महापालिकेच्या आरोग्य विभागात गेल्या अनेक वर्षांपासून एकाच विभागाचा पदभार आपल्याकडे ठेवत अधिकाऱ्यांकडून मनमानी कारभार सुरू असल्याचे समोर आले होते. तसेच काही आरोग्य अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केल्याचीही प्रकरणे समोर आली आहेत. आरोग्य प्रमुखांना अंधारातून ठेवून स्वतःच स्वाक्षरी करून संबंधित बिले पास करण्याचा गंभीर प्रकारदेखील समोर आला होता. हे सर्व प्रकार रोखण्यासाठी आयुक्तांनी थेट विभागाची जबाबदारी बदलण्याचे आदेश दिले आहेत.



आयुक्तांच्या आदेशाने पदभार तत्काळ सोडणे अपेक्षित असताना काही अधिकारी त्याच पदावर अडून बसले असून पदभार सोडत नसल्याचे चित्र आहे. विभागाचा कार्यभार न सोपवताच काही आरोग्य अधिकारी सुटीवर गेले आहेत. त्यामुळे कार्यभार कसा घ्यावा, असा प्रश्न उपस्थित झाला होता. मात्र, आयुक्तांनी थेट आदेश दिल्याने आता एकाच विभागात अडून बसलेल्या अधिकाऱ्यांना काहीही करून पदभार सोडावा लागणार आहे.

आजारी पडलो आहे, वैयक्तिक कारणास्तव सुटी आहेत, अशा सबबी सांगून आरोग्य अधिकारी रजेवर गेले आहेत. काही अधिकारी हजर आहेत पण कार्यभार घेण्यासाठी वेळ घेत आहेत. 'थांबा, थोडे कामात आहे,' असे सांगून पदभार स्वीकारला जात नसल्याने इतर अधिकाऱ्यांची पंचाईत झाली आहे. आयुक्त डॉ. भोसले यांनी काढलेल्या आदेशाला साहाय्यक आरोग्य अधिकाऱ्यांकडून केराची टोपली दाखविली जात असल्याची चर्चा पालिकेत रंगली असतानाच त्यांनी दिलेल्या तंबीमुळे संबंधित अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

दरम्यान, एका साहाय्यक आरोग्य अधिकाऱ्याने थेट आयुक्तांना तीन पानी पत्र लिहिले असून पदभार काढून न घेण्याची मागणी केली आहे. त्यांनी संबंधित विभागात केलेल्या कामाची माहिती देत आपण या विभागात चांगले काम केले असून, हेच विभाग माझ्याकडे कायम ठेवण्याची विनंती केली आहे. एका साहाय्यक आरोग्य अधिकाऱ्याकडील कोणताच विभाग काढला गेला नाही, असा आरोप या अधिकाऱ्याने केला आहे. एका साहाय्यक आरोग्य अधिकाऱ्याने त्याच्याकडे असलेल्या काही विभागाचा पदभार आयुक्तांच्या आदेशानुसार हस्तांतरित केला आहे. मात्र, त्यांच्याकडे सोपविलेल्या विभागाचा पदभार अद्याप संबंधित साहाय्यक आरोग्य अधिकाऱ्याकडून सोपविला गेला नाही. त्यामुळे जे पदभार सोडणार नाहीत, त्या अधिकाऱ्यांचा पदभार एकतर्फी काढून घेतला जाईल. कार्यभार सोडण्यास टाळाटाळ केल्यास त्यांच्यावर योग्य कारवाई करण्याचा इशारा महापालिका आयुक्त डॉ. भोसले यांनी दिला आहे.

### आरोग्य विभागाला राजकारणाने ग्रासले

» शहरात डेंगी, चिकनगुनिया, झिकाचे रुग्ण वाढत आहेत. रुग्णांना आयसीयू बेड मिळण्यास अडचणींचा सामना करावा लागत आहे, असे असतानाच महापालिकेतील आरोग्य विभागाला राजकारणाने ग्रासले असल्याने पुणेकरांकडून संताप व्यक्त केला जात आहे. राजकीय पक्षांनीही या गंभीर मुद्द्याकडे लक्ष वेधले आहे. शहरी गरीब योजना, नर्सिंग होम परवानगी, औषध भांडार, राज्य आणि केंद्र सरकारच्या योजना हे विभाग नेहमीच चर्चेचे ठरत आहेत. याच भोवती आरोग्य विभागातील राजकारण फिरत आहे.

> महापालिकेत विभागातील कार्यभार कोणाकडे द्यायचा, हा आयुक्तांचा अधिकार असतो. त्यामुळे बदलीचे आदेश दिल्यानंतर त्याचे पालन करावेच लागणार आहे. एकदा आयुक्तांनी आदेश दिल्यानंतर पदभार सोडला नाही तरी एकतर्फी तो काढून घेता येतो. पदभार न सोडणाऱ्या आरोग्य अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई केली जाईल. कोणी फाईल घरी नेल्या असल्यास त्याची तपासणी केली जाईल.
>
> **- डॉ. राजेंद्र भोसले, आयुक्त, पुणे महापालिका.**

# सासवड येथील नवीन प्रशासकीय इमारतीचे अजित पवारांच्या हस्ते लोकार्पण

## नवीन प्रशासकीय इमारतीतून लोकाभिमुख सेवा देण्याचे काम करावे : उपमुख्यमंत्री अजित पवार

**पिंपरी | प्रतिनिधी**

नवीन प्रशासकीय इमारतीतून नागरिकांना केंद्रबिंदू मानून लोकाभिमुख सेवा देण्याचे काम करावे, स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या सूचनांवर सकारात्मक कार्यवाही करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले.

सासवड येथील नवीन प्रशासकीय भवनाच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार संजय जगताप, माजी राज्यमंत्री विजय शिवतारे, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, उप विभागीय अधिकारी वर्षा लांडगे, अधीक्षक अभियंता बप्पा बहीर, कार्यकारी अभियंता अनुराधा भंडारे, तहसीलदार विक्रम राजपूत, गट विकास अधिकारी अमिता पवार,



पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे आदी उपस्थित होते.

अजित पवार म्हणाले, जिल्ह्यातील नागरिकांना उत्तम दर्जाची सेवा मिळावी म्हणून विविध शासकीय इमारतींचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहेत. त्याप्रमाणे आज या इमारतीचे लोकार्पण करण्यात आले आहे. नागरिकांच्या शंकांचे समाधान करण्याकरीता त्यांच्या अडीअडचणी व्यवस्थितपणे समजून घेतल्या पाहिजे. त्यांना कार्यालयात वारंवार यावे लागू नये यासाठी उत्तम सेवा देण्यासाठी प्रशासनाने काम करावे.

या इमारतीच्या परिसरात हवामानाला अनुरूप सावली देणाऱ्या विविध वृक्षांचे वृक्षारोपण करावे. इमारतीचा परिसर स्वच्छ राहील याबाबत प्रशासनाने दक्षता घ्यावी, त्यासाठी नागरिकांनीही सहकार्य करावे. नागरिकांसाठी परिसरात वाहनतळ करण्यात यावे, या इमारतीतील प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करावी, अशा सूचना अजित पवार यांनी केल्या.

आगामी काळातही सासवड येथील उप विभागीय पोलीस अधिकारी आणि पोलीस ठाण्याचे बांधकाम करण्यात येईल. याकरीता वेगवेगळ्या वास्तुविशारदाकडून संकल्पचित्रे तयार करुन घ्यावेत, याकामांसाठी जिल्हा नियोजन समितीमधून निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असेही अजित पवार म्हणाले.

यावेळी अजित पवार यांच्या हस्ते उपविभागीय अधिकारी, तहसीलदार कक्ष व सेतू सेवा केंद्राचे उद्घाटन केले. अजित पवार यांनी प्रशासकीय इमारतीतील विविध कक्षाची पाहणी करुन कामांची माहिती घेतली.

### नवीन प्रशासकीय इमारतीची वैशिष्ट्ये

» पिंपरी-चिंचवड शहर आणि धरण क्षेत्रात पाऊस सुरू झाल्याने धरणातून पाण्याचा विसर्ग केला जात आहे. त्यामुळे शहरातून वाहणाऱ्या पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी आपत्कालीन यंत्रणेला दक्ष राहण्याचे आदेश दिले असून नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांना सतर्क राहावे, असे आवाहनही केले आहे.